नियमित फौजदारी खटला क्र. २७९/२००८
निशाणी क्र. २२

**(आरोपीच्या अनुउपस्थीतीत फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे साक्षीदाराचा जबाब)**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक – १**

मी सत्यप्रतिज्ञेवर निवेदन करते की,
माझे नाव - जिजाबाई मारुती यादव,
वय - सज्ञान, धंदा - शेती,
सध्या रा. - कुळे, मुळशी.

**सरतपासणी सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती व्ही. आर. बकाल यांचेमार्फत**

१. घटना १५-१६ वर्षांपूर्वी घडली. सकाळी ९ वाजेच्या सुमारास आळंदी येथे पुलाच्या पुढे पालखी आलेली असताना सदर ठिकाणी घटना घडली. मी दिंडीमध्ये सहभाग घेतला होता व माझे पती पालखीमध्ये होते. मी दर्शन घेत असताना माझ्या गळयातील मंगळसुत्र, तुळशीची माळ व मणी मंगळसुत्र कोणीतरी कातरले. त्यानंतर मी आजुबाजुच्या लोकांना चोरी झाल्याचे सांगितले. तेव्हा त्या लोकांनी खाली पडलेले माझे मंगळसुत्र, तुळशीची माळ व मणी मंगळसुत्र माझ्या हातात दिले. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला गेले व तक्रार दिली. चोराचे नाव मला आठवत नाही. आता मला सदरची तक्रार दाखविण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावरील अंगठा माझा आहे. फिर्यादीस **नि. क्र. २१** देण्यता येतो. माझे दागिने मला पोलीसांनी परत दिले.

**सरतपास पुर्ण.**

श्रवणोत्तर स्विकृत

PRAJKTA SHIRISH APTE
Digitally signed by PRAJKTA SHIRISH APTE
Date: 2025.03.06 16:10:01 +0530

दिनांक – ०६/०३/२०२५

**(पी. एस. आपटे )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र. २, खडकी, पुणे.

**(आरोपीच्या अनुउपस्थीतीत फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे साक्षीदाराचा जबाब)**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक – २**

मी सत्यप्रतिज्ञेवर निवेदन करते की,
माझे नाव - राजेंद्र मधुकर गिरी,
वय - ६२, धंदा - सेवानिवृत्त,
सध्या रा. - विश्रांतवाडी

**सरतपासणी सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती व्ही. आर. बकाल यांचेमार्फत**

१. मी विश्रांतवाडी पोलीस स्टेशन येथे सन २००८ मध्ये पोलीस उप-निरीक्षक म्हणुन नियुक्त होतो. दि. २७.०६.२००८ रोजी मला पालखी बंदोबस्ताची डयुटी होती. त्यादिवशी कर्तव्यावर हजर असताना पालखीमध्ये गर्दीच्या वेळी एक जिजाबाई यादव या महिलेच्या गळयातील मंगळसुत्र, तुळशीची माळ व मणी मंगळसुत्र गळयाला हिसका देवून कोणीतरी चोरली. त्यानंतर सदर फिर्यादी पोलीस स्टेशनला आली. त्यांच्या एकुण ४ माळा चोरीला गेल्या होत्या. दरम्यान आम्ही पोलीस स्टेशनला दोन महिलांना आधीच पकडले होते. त्यांच्या ताब्यात काही सोन्याचे तुटलेले दागिने मिळुन आले. ते आम्ही फिर्यादीस दाखवले त्यांनी त्यांच्या ४ ही माळा ओळखल्या. त्यांनंतर आम्ही त्यांची फिर्याद दाखल करुन घेतली. आता मला नि. क्र. २१ दाखवली ती मीच नोंदवली असुन त्यावर माझी सही व फिर्यादीचा अंगठा आहे. सदर फिर्यादीवरुन विश्रांतवाडी पोलीस स्टेशन येथील गु. र. क्र. २१०/२००८ हा गुन्हा भा.द.वि कलम ३७९ अन्वये दाखल केला. त्याचा पुढील तपास मीच केला. तपासदरम्यान मी निष्पन्न दोन आरोपी नामे जिबुबाई कांबळे व ललीला गव्हाणे यांना अटक करुन त्यांच्याकडे मिळुन आलेल्या दागिन्यांचा दोन पंचासमक्ष जप्ती पंचनामा केला. सदर पंचनामा मला दाखविण्यात आला. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यास **निशाणी क. २३** देण्यात येते. ते दागिने पाहिल्यास मी ओळखू शकतो. सदर दागिने फिर्यादीला परत दिले आहेत. साक्षीदारांचे टिपण नोंदवले. तपासाअंती आरोपींविरुद्ध दोषारोपत्र न्यायालयात दाखल केले. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो.

**सरतपास पुर्ण.**

श्रवणोत्तर स्विकृत

PRAJKTA SHIRISH APTE
Digitally signed by PRAJKTA SHIRISH APTE
Date: 2025.03.06 16:10:07 +0530

दिनांक – ०६/०३/२०२५

**(पी. एस. आपटे )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र. २, खडकी, पुणे.